महाराष्ट्र शासन

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**नगर रचना संचालनालय**

**मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र.** ०२०-२६१२ २०७६

Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in ddtpho_pune@rediffmail.com

---

## कार्यालयीन आदेश

**विषय :** नगर रचनाकार, गट-अ (राजपत्रित) मधील अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय करण्याबाबत.

**संदर्भ:**
१) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-१०९५ /प्र.क्र.१/ ९५/ बारा, दिनांक ८ जून १९९५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २० जुलै २००१.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३, दिनांक ११ जानेवारी २००२.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/ सेवा ३, दिनांक १ एप्रिल २०१०.
५) शासन निर्णय, वित्त विभागक्र. वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा ३, दिनांक ५ जुलै २०१०.
६) शासन, वित्त विभाग शुध्दीपत्रक क्र.वेतन-१११०/प्र.क्र.०८/२०१०/सेवा-३, दि.०१/०२/२०२०.
७) शासन, नगर विकास विभाग क्र.टिपीव्ही-१५१०/११५५/प्र.क्र.२९६/नवि-२७, दि.०८ जून,२०२१.
८) शासन, नगर विकास विभाग क्र.टिपीव्ही-१५१२/१२८०/प्र.क्र.२२१/नवि-२७, दि.१५ जून, २०२१.

संदर्भ (१) दिनांक ८ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये अंमलात आलेली गट-क व गट-ड (वर्ग-३ व वर्ग-४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची कालबद्ध पदोन्नती योजना संदर्भ (२) दिनांक २० जुलै २००१ च्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आली असून त्याऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासनाने लागू केली आहे. ही योजना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.८०००-२७५-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आली आहे. संदर्भ (३) दिनांक ११ जानेवारी, २००२ च्या शासन निर्णयान्वये, या योजनेचा लाभ अनुज्ञेय असलेल्या गट-अ मधील राजपत्रित तसेच गट-ब मधील राजपत्रित

व अराजपत्रित अधिकारी/कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मंजूर करण्याचे अधिकार राज्यस्तरीय विभाग प्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत.

०२. संदर्भ क्र.(२) दि.२० जुलै २००१ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र.(५) शासन निर्णय दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, सुधारित स्वरुपात यापुढे **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना या नावाने दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून अंमलात आली आहे.** ही योजना कमाल वेतन बँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + ५४००/- ग्रेड पे. घेणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना इतर शर्ती व अटीचे अधिन राहून सदर लाभ अनुज्ञेय केलेला आहे.

०३. संदर्भ क्र.(४) दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, कार्यान्वित असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र.(५) शासन निर्णय दि.५ जुलै, २०१० अन्वये, शासनामधील पदोन्नतीची संधी नसलेल्या तसेच एकाकी पदांना दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून लागू करण्यात आली आहे. तसेच सदरहु सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कमाल वेतनबँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + रु.५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या एकाकी पदांवरील कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आली असून या योजनेखाली पात्र कर्मचा-यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा वेतनसंरचना मंजूर करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

०४. शासना, वित्त विभागाच्या संदर्भ क्र.(६) च्या दि.०१ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये विहित संधीत/ मुदतीत अर्हता परिक्षा किंवा विभागीय परिक्षा उत्तीण न झाल्यामुळे ज्येष्ठता गमावलेल्या व परिणामी कालबध्द पदोन्नतीसाठी अपात्र ठरलेल्या काही कर्मचाऱ्यांनी कालबध्द पदोन्नतीचे लाभ मिळणेबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.२२/२००५, ७३१/२००६, ३५७/२००६, मूळ अर्ज क्र.३२८/२०१० व संलग्न मूळ अर्ज यामधील अर्जदार तसेच मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांमधील न्याय निर्णयाच्या अनुषंगाने, शासन निर्णय वित्त विभाग दि.१५/१०/२००९ तसेच शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग दि.२१/०५/२०१०, या शासन शुध्दीपत्रका अन्वये रद्द करुन (Canceling)पुढीलप्रमाणे सुधारित शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

(अ) अर्हता परीक्षा किंवा विभागीय परीक्षा विहित संधीत/ मुदतीत उत्तीर्ण न झाल्यामुळे ज्येष्ठता गमावली असेल अशा कर्मचाऱ्यांने १२ वर्षांच्या नियमित सेवा कालावधीत सदर परीक्षा उत्तीर्ण केल्यास त्याला नियमित सेवेची १२ वर्ष पूर्ण झाल्यानंतरच्या लगतच्या तारखेस.

अथवा

ब) १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर, विभागीय/ ***अर्हता परीक्षा*** उत्तीर्ण झाल्याच्या तारखेस

०५. उपरोक्त (अ) अथवा (ब) यापैकी कोणत्याही प्रकारात मोडणाऱ्या कर्मचारी/ अधिकारी यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीतील पात्रतेनुसार, (त्याच्या सुधारीत ज्येष्ठता सूचीतील स्थानात बदल न करता) कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत/ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी देण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे.

०८. संदर्भ क्र.(७) च्या आदेशान्वये श्री.कुमावत यांचा निलंबन कालावधी नियमित करण्याबाबत पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

१. श्री.कुमावत यांच्याविरुध्द दाखल गुन्हयात मा.विशेष न्यायालय, पुणे यांनी दि.२९/११/२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयान्वये दोषमुक्त केले आहे. ***सदर न्यायनिर्णया विरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.२८/०६/२०१९ अन्वये रिव्हीजन दाखल करणत आले आहे.***

२. मा.न्यायालयाच्या उक्त निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपील दाखल केले असल्याची बाब, श्री.कुमावत हे दि.३१/०५/२०१८ रोजी शासन सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याने व अपिलावर निर्णय होण्यास काही विलंब लागण्याची शक्यता विचारात घेता, श्री.कुमावत यांचे विरुध्द सुरु करण्यात आलेली विभागीय चौकशी दि.३०/०४/२०२१ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे, श्री.कुमावत यांचे निलंबन असमर्थनीय ठरले आहे.

३. आता वरील पार्श्वभूमीवर श्री.शि.रा.कुमावत, सेवानिवृत्त नगर रचनाकार यांचा निलंबन कालावधी नियमित करण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२(ए) व (बी) मधील तरतुदीचा वापर करुन पुढलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

(अ) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२ (ए) व (बी) मधील तरतूदींचा वापर करुन श्री.शि.रा.कुमावत, सेवानिवृत्त नगर रचनाकार यांचा दि.२८/११/२००५ ते दि.१७/१२/२०१२ हा निलंबन कालावधी सेवाविषयक सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणून "कर्तव्य कालावधी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(आ) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२ (३) व ७२(४) मधील तरतूदीनुसार श्री.शि.रा.कुमावत, सेवानिवृत्त नगर रचनाकार यांना निलंबित करण्यात आले नसते तर, जितके वेतन व भत्ते मिळण्यास ते हक्कदार झाले असते, तितके पूर्ण वेतन व भत्ते श्री.कुमावत यांना अदा करण्यात यावेत व त्यामधून श्री.कुमावत यांना उपरोक्त निलंबन कालावधीत निवार्ह भत्यापोटी अदा करण्यात आलेली रक्कम समायोजित करण्यात यावी.

०९. संदर्भ क्र.(८) च्या आदेशान्वये श्री.कोठावदे यांचा निलंबन कालावधी नियमित करण्याबाबत पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

१. श्री.कोठावदे यांच्या विरुध्द दाखल गुन्ह्यात मा.अप्पर सत्र न्यायाधिश तथा विशेष न्यायालय, धुळे यांनी दि.१८/१२/२०१९ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयान्वये त्यांना दोषमुक्त केलेले आहे. यास्तव श्री.कोठावदे यांचेविरुध्द सुरु करण्यात आलेली विभागीय चौकशी दि.२२/०४/२०२१ रोजीच्या ज्ञापनान्वये रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे श्री.कोठावदे यांचे निलंबन असमर्थनीय ठरले आहे.

२. वरील पार्श्वभूमीवर श्री.स.पु.कोठावदे, सेवानिवृत्त नगर रचनाकार यांचा निलंबन कालावधी नियमित करण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२(ए) व (बी) मधील तरतुदीचा वापर करुन पुढलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

(अ) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२ (ए) व (बी) मधील तरतूदींचा वापर करुन श्री.स.पु.कोठावदे, सेवानिवृत्त नगर रचनाकार यांचा दि.०८/०९/२०११ ते दि.१९/०९/२०१३ हा निलंबन कालावधी सेवाविषयक सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणून "कर्तव्य कालावधी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(आ) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२ (३) व ७२(४) मधील तरतूदीनुसार श्री.स.पुं.कोठावदे, सेवानिवृत्त नगर रचनाकार यांना निलंबित करण्यात आले नसते तर, जितके वेतन व भत्ते मिळण्यास ते हक्कदार झाले असते, तितके पूर्ण वेतन व भत्ते श्री.कोठावदे यांना अदा करण्यात यावेत व त्यामधून श्री.कोठावदे यांना उपरोक्त निलंबन कालावधीत निवार्ह भत्यापोटी अदा करण्यात आलेली रक्कम समायोजित करण्यात यावी.

१०. उपरोक्त सर्व शासन निर्णय विचारात घेऊन तसेच दिनांक ०१/०२/२०२० च्या शासन, वित्त विभागाच्या शुध्दीत्रकातील अटींच्या अधीन राहून नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील नगर रचनाकार, गट-अ (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

## सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ.

१) नगर रचनाकार पदावर कार्यरत खालील अधिकाऱ्यांस दुसरा लाभ म्हणून सहायक संचालक, नगर रचना (गट-अ) या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ६६००/-) मध्ये तर सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२३, रु.६७७००-२०८७००/- मध्ये मंजूर करण्यात येत आहे.

२) दि.१ एप्रिल, २०१० रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार पदविकाधारक नगर रचनाकारांबाबत, रचना सहायक पदावरील ५ वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर देण्यात आलेली वरिष्ठ वेतनश्रेणी (दर्जा) हा योजनेचा पहिला लाभ म्हणून धरण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

| अ. क्र. | नाव व शैक्षणिक अर्हता | जातीचा प्रवर्ग/ जातीदावा वैध/अवैध | सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात आल्याचा दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.शि.रा.कुमावत डी.सी.ई. | भ.ज.(ब) (वैध) | २२/०६/१९८६ | २१/०९/२००७ | दि.१५/०२/१९८८ पासून न.र. पदावर कार्यरत. शासन निर्णय, वित्त विभाग दि.०१/०२/२०२० रोजीच्या शुध्दीपत्रकातील सुधारित स्पष्टीकरणातील (ब) नुसार तसेच मा.विशेष न्यायालय, पुणे यांनी दि.२९/११/२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयान्वये दोषमुक्त केले आहे. परंतू सदर न्यायनिर्णया विरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.२८/०६/२०१९ रोजी REVNST/३८९/२०१९ अन्वये रिव्हीजन दाखल करणत आलेले आहे. सदर मा.उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधिन राहून व संदर्भ क्र.(७) च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर. |
| २ | श्री.स.पुं.कोठावदे डी.सी.ई. | खुला | १४/०६/१९८७ | २८/०६/२०१२ | दि.२८.०६.२००० पासून न.र. पदावर कार्यरत. मा.अप्पर सत्र न्यायाधिश तथा विशेष न्यायालय, धुळे यांनी दि.१८/१२/२०१९ रोजी दिलेला न्याय निर्णयान्वये व संदर्भ क्र.(८) च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर. |

११. वरील अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ खालील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११ (१) खालील पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठी द्यावयाचा विकल्प अनुज्ञेय आहे. त्यांनी तसा विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. त्यानंतर आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही, आणि त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र. ११(१) (ए) नुसार केली जाईल.

२. संदर्भ क्र.(७) व (८) मधील अटींच्या अधिन राहून संबंधित अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आवश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यात येत आहे. सदर आदेशात नमूद करण्यात आल्यानुसार त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित योजनेच्या रक्कमेचा फरक अदा करण्यात यावा.

३. जे अधिकारी/ कर्मचारी सेवानिवृत्तीच्या वेळी/सध्यस्थितीत प्रतिनियुक्तीवर/इतर विभागामध्ये कार्यरत आहेत/होते त्यांच्या बाबतीत ते प्रतिनियुक्तीवर/इतर विभागामध्ये जाण्यापूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होते त्या कार्यालयाने किंवा विभागीय कार्यालयाने त्यांना वरील योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करादी.

४. जे अधिकारी/ कर्मचारी या आदेशाच्या दिनांकास सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांच्याबाबत ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत त्या कार्यालयाने त्यांना वरील योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. तसेच जे अधिकारी/ कर्मचारी प्रतिनियुक्तीवर/ इतर विभागामध्ये कार्यरत असताना सेवानिवृत्त झाले आहेत अशा अधिकाऱ्यांची वेतन निश्चिती संबंधित विभागीय कार्यालयाने करावी व ज्या कार्यालयाने सदर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना निवृत्तीवेतन विषयक लाभ मंजूर करुन अदा केले आहेत त्या कार्यालयाने/ आहरण व संवितरण अधिकाऱ्याने या आदेशानुसार संबंधितांस लाभाची रक्कम अदा करावी.

५. शासन निर्णय दि.१ जुलै २०११ सोबतचे परिशिष्ट-अ मधील मुद्दा क्र.१३ मधील स्पष्टीकरण विचारात घेता सदर अधिकारी/ कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त असल्याने त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा आर्थिक लाभ मंजूर करण्यात येत आहे.

६. या आदेशान्वये मंजूर करण्यात येत असलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाची नोंद संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**(मूळ मसुदा मा.संचालकांनी मंजूर केला आहे.)**

(वि.ल.वाघमोडे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता.

जा.क्र.आस्था/सुसेआप्रयो/गट-अ/प्रशा-१/३०६४
मध्यवर्ती कार्यालये, पुणे – ४११ ००१
दिनांक -१४/०७/२०२१

प्रत : मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, नवि-२७/नवि-३, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
प्रत : मा.नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.
प्रत : मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद
प्रत : मा.महालेखापाल, मुंबई-१/नागपूर-२.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१) सहसंचालक, नगर रचना, अं.क. पुणे/ मूल्यांकन पुणे/ पुणे विभाग/ कोकण विभाग/नागपूर विभाग/ नाशिक विभाग/ औरंगाबाद विभाग/ अमरावती विभाग.
२) उपसंचालक, नगर रचना, ना.सं.घ.,पुणे.
३) जिल्हाधिकारी, नांदेड . जिल्हा नांदेड.
४) नगर रचनाकार, जिल्हा सत्र न्यायालय, पुणे.
५) नगर रचनाकार,वर्ग-१, मूल्यांकन तज्ञ, नांदेड/परभणी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
६) कोषागार अधिकारी, ------------------
७) कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, प्रशा-१/ प्रशा-१अ /प्रशा-१ ब/ प्रशा-२/ लेखा / अर्थसंकल्प.
८) श्री.पालकर, स्वी.स./श्रीमती हुपरे, उ.श्रे.ल.ले.
९) संशोधन अधिकारी, ना.सं.घ./ रा.ना.मा.प.कक्ष
//- प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.
१०) वैयक्तिक धारिका

<u>प्रत विहित मार्गाने रवाना.</u>

१ श्री.शि.रा.कुमावत, (से.नि.), नगर रचनाकार, जिल्हा सत्र न्यायालय, पुणे.
२ श्री.स.पुं.कोठावदे, (से.नि.), नगर रचनाकार, मूल्यांकन तज्ञ, नांदेड/परभणी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेङ